


# शिक्षण

ज्ञान हे विशाल सागरासारखं आहे. उत्क्रांतीच्या टप्प्यांमधून जात काही हजार वर्षांपूर्वी आजचा माणूस अस्तित्वात आला. तेव्हापासून त्याचे अनुभव, त्याचं निरीक्षण, जीवनासाठी त्याला करावा लागलेला संघर्ष या साऱ्यातून ज्ञानाचे कण तो गोळा करत आला आहे. प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग तो त्याच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि मानवी जीवन अधिक विकसित व समृद्ध करण्यासाठी तो करीत आला आहे, आणि ज्ञानाचा असा उपयोग करत असताना ज्ञानाचा साठा कमी झाला नाहीच उलट तो वाढतच गेला आहे, वृद्धिंगत झाला आहे. ज्ञानाचं हे समृद्ध भांडार हे मानवी संचित आहे आणि ते प्रवाही आहे. रिले शर्यतींमध्ये जसा एक खेळाडू त्याचा टप्पा पूर्ण होताना हातातील बॅटन दुसऱ्या खेळाडूकडे सोपवतो तसं ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत आलं आहे. ज्ञानाचं असं हस्तांतरण होणं म्हणजे शिक्षण. एक पिढी पुढच्या पिढीला जगणं शिकवते, जगण्याचं शिक्षण देते. शिकणं आणि शिकवणं या दोन्ही शिक्षणाशी निगडित कृती आहेत. शिकणं आणि शिकवणं या संदर्भातून शिक्षणाचा आपण विचार करू लागलो, तर त्याच्या बहुविध बाजू आपल्या समोर येतात. उदाहरणार्थ, शिकणं केव्हा सुरू होतं? आणि केव्हा संपतं? की शिकणं कधीच संपत नाही, थांबत नाही? महाभारतातील एक उदाहरण सर्वांच्या परिचयाचं आहे. श्रीकृष्ण सुभद्रेला चक्रव्यूहात कसं शिरायचं, चक्रव्यूहाचा भेद कसा करायचा याबद्दल सांगत होते. सुभद्रा गर्भवती होती. तिच्या

पोटात अभिमन्यू होता. श्रीकृष्ण सांगत असताना सुभद्रेला झोप लागली. श्रीकृष्णाच्या हे लक्षात आल्यानंतर त्यानी बोलणं थांबवलं. सुभद्रेच्या गर्भातल्या अभिमन्यूला चक्रव्यूहाचा भेद कसा करायचा याचं ज्ञान मिळालं परंतु त्यातून बाहेर पडण्याचं नाही. महाभारत युद्धात त्याने चक्रव्यूहात प्रवेश केला परंतु तो चक्रव्यूहातून बाहेर पडू शकला नाही. कौरव सेनेने त्याचा अंत केला. याचा अर्थ अभिमन्यूचं शिक्षण गर्भातूनच सुरू झालं होतं. आपण जे गर्भसंस्कार म्हणतो, ते बहुधा हेच असावेत. ज्यावेळी एखादं बीज अंकुरतं तेव्हा त्याच्याभोवती जी परिस्थिती असते, जे पर्यावरण असतं त्यातून बीजावस्थेत त्याच्यावर होणाऱ्या संस्काराचा परिणाम घडत असावा.

मूल जन्माला येतं तेव्हा आईकडून त्याच्यावर होणारे संस्कार महत्त्वाचे असतात. आई बाळाला स्तनपान करते, त्याला खेळवते. त्याच्यासाठी गाणं म्हणते, बोबडे बोल बोलते, यातून कळत नकळत बाळाचं शिक्षण होत असतं. त्याच्या पिठासारख्या मऊ मनावर संस्कारांची बोटं उमटत असतात. आईने बाळाला स्तनपान करणं हे बाळाच्या व आईच्या दृष्टीनेही खूप महत्त्वाचं असतं. एक म्हणजे आई व बाळामध्ये जवळकीचं नातं तयार होतं. बाळाच्या मानसिक वाढीकरता ते पोषक ठरतं. दुसरं म्हणजे बाळाची रोगप्रतिकारकशक्ती वाढते. वासरू जेव्हा जन्माला येतं, तेव्हा बारा तासांत त्याला गाईचा चीक पाजण्याबद्दल सांगितलं जातं, कारण त्यातून वासराला रोगप्रतिकारक शक्ती मिळते. आईच्या दृष्टीने भावी काळात ब्रेस्ट कॅन्सर किंवा अन्य प्रकारचे कॅन्सर होण्याची शक्यता कमी होते. हे झालं माता व बाळाच्या शारीरिक-मानसिक आरोग्याच्या संदर्भात, पण स्तनपानामुळे आई व बाळामध्ये दृढ नातं निर्माण होतं, त्याच्यावर आईचे संस्कार घडतात. तथापि, अलीकडच्या काळात बाळाला स्तनपान करणं हे अनेकदा कमीपणाचं वाटतं, आपला सुडौल बांधा बिघडू नये म्हणून अनेक माता स्तनपान करणं टाळतात, हे योग्य नाही.

मुलांच्या वाढीच्या काळात त्यांना आई-वडिलांचं सान्निध्य गरजेचं असतं. आजी-आजोबा, काका-मावशी, भावंड यांच्याकडून बाळाला प्रेम मिळत असतं, त्याचे लाड होत असतात. त्याच्याशी खेळण्यातून, त्याच्याशी बोलण्यातून, त्याच्याशी दंगामस्ती करण्यातून त्याचं कळत नकळत शिक्षण होत असतं, संस्कार घडत असतात. पण आजकाल शहरांमध्ये एकत्र कुटुंब राहीलेली नाहीत त्यामुळे आजी-आजोबा, काका-मावश्या, भावंड मुलांना मिळेनाशी झाली आहेत. आई-वडिलांनाही मुलांसाठी वेळ नसतो, कारण दोघंही नोकरी करत असतात. त्यामुळे मूल सहा महिने-वर्षाचं



झालं की, त्याला पाळणा-घरात ठेवलं जातं. दोन-अडीच वर्षापर्यंत पाळणा-घरात काढल्यानंतर मूल नर्सरीत जाऊ लागतं, प्ले ग्रुप, ज्युनिअर के.जी., सिनिअर के.जी. अशा पायऱ्या चढत पाचव्या-सहाव्या वर्षी ते शाळेत दाखल होतं. नर्सरी-के.जी.पासूनच त्याच्या पाठीवर दप्तराचं ओझं लादलं जातं. त्याला एका सिस्टिममध्ये बसवलं जातं. मुद्दा हा आहे की, नैसर्गिकरीत्या मुलाची शारीरिक-मानसिक वाढ, बौद्धिक जाण वाढायला हवी, तसं न होता काहीश्या अनैसर्गिकपणे-कृत्रिमपणे हे घडतं, त्यातून अपेक्षित परिणाम साधतो का? हा प्रश्न आहे. आम्ही लहान होतो, तेव्हा पाचव्या वर्षांपर्यंत आम्हाला शाळा माहीत नव्हती. एखाद्या देवळात आम्ही बालवाडीत जायचो. एखादी शिक्षिका असायची. ती गाणी शिकवायची, आम्ही डबा खायचो आणि घरी परत यायचो. हे सर्व आनंददायी होतं, खुलं होतं. आम्ही पहिली पासून मॅट्रिकपर्यंत आणि पुढे महाविद्यालयातही शाळेच्या पाण्याच्या टाकीतलं पाणी पित आलो, आम्हाला घरातून पाण्याची बाटली घेऊन शाळेत जावं लागलं नाही. आज नर्सरी पासून मुलांना पाण्याच्या बाटलीचं ओझं बाळगावं लागत आहे. एकंदरीतच आजच्या बदललेल्या परिस्थितीचा, शैक्षणिक वातावरणाचा विचार करताना प्रश्न पडतो की, आपण शिक्षणाचा विकास केला की ऱ्हास?

एक गोष्ट खरी आहे की, गेल्या काही दशकांत देशात शिक्षणाच्या प्रमाणात नक्कीच वाढ झाली आहे. २००१ च्या जनगणनेनुसार देशपातळीवर साक्षरतेचं प्रमाण ६४.८४ टक्के होतं. ते २०११ मध्ये ७४.०४ टक्के इतकं वाढलं आहे. दहा वर्षांत हे प्रमाण जवळपास १० टक्क्यांनी वाढलं आहे. देशातील सर्वच राज्यांमध्ये या प्रमाणात वाढ झाल्याचं दिसतं, तसंच स्त्रियांच्या साक्षरतेतही लक्षणीय वाढ दिसून येत आहे. एकूणच प्राथमिक, माध्यमिक व उच्चशिक्षणात वाढ झाली आहे. (आकडेवारी पाहा) पण खरोखरच शिक्षणाचा विकास झाला आहे का?

**साक्षरतेमध्ये आघाडीवर असलेली दहा राज्ये**

| क्र. | राज्य | साक्षरता दर २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| १ | केरळ | ९२.२ | ९३.९ |
| २ | मिझोराम | ८८.८ | ९१.६ |
| ३ | त्रिपुरा | ७३.२ | ८७.८ |
| ४ | गोवा | ८७.४ | ८७.४ |
| ५ | हिमाचल प्रदेश | ७६.५ | ८३.८ |
| ६ | नागालॅन्ड | ७६.९ | ८२.९ |
| ७ | सिक्कीम | ६८.८ | ८२.२ |
| ८ | तमिळनाडू | ७३.४ | ८०.३ |
| ९ | महाराष्ट्र | ६६.६ | ८०.१ |
| १० | पंजाब | ६९.६ | ७९.९ |

**साक्षरतेमध्ये पिछाडीवर असलेली दहा राज्ये**

| क्र. | राज्य | साक्षरता दर २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| १ | आसाम | ६३.२५ | ७३.२ |
| २ | छत्तीसगढ | ६४.६६ | ७१.७ |
| ३ | मध्यप्रदेश | ६०.५३ | ७०.६ |
| ४ | उत्तरप्रदेश | ५६.२७ | ६९.७ |
| ५ | जम्मू-काश्मीर | ५५.५२ | ६८.७ |
| ६ | आंध्र प्रदेश | ६०.४७ | ६७.७ |
| ७ | झारखंड | ५३.५६ | ६७.६ |
| ८ | राजस्थान | ६०.४१ | ६७.१ |
| ९ | अरुणाचल प्रदेश | ५४.३४ | ६७.० |
| १० | बिहार | ४७.० | ६३.८ |

**सर्वाधिक साक्षर स्त्रिया असलेली दहा राज्ये**

| क्र. | राज्य | स्त्रियांच्या साक्षरतेचं प्रमाण (२०११) |
|---|---|---|
| १ | मिझोराम | ८९.४ |
| २ | केरळ | ८८.२ |
| ३ | त्रिपुरा | ८३.१ |
| ४ | गोवा | ८१.८ |
| ५ | हिमाचल प्रदेश | ७६.६ |
| ६ | नागालॅण्ड | ७६.६ |
| ७ | सिक्कीम | ७६.४ |
| ८ | महाराष्ट्र | ७५.५ |
| ९ | तामिळनाडू | ७३.९ |
| १० | पंजाब | ७१.३ |

**साक्षरतेमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी असलेली दहा राज्ये**

| क्र. | राज्य | स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण (टक्केवारी) (२०११) |
|---|---|---|
| १ | आसाम | ६७.३ |
| २ | छत्तीसगढ | ६०.६ |
| ३ | मध्यप्रदेश | ६०.० |
| ४ | आंध्रप्रदेश | ५९.७ |
| ५ | अरुणाचल प्रदेश | ५९.६ |
| ६ | उत्तर प्रदेश | ५९.३ |
| ७ | जम्मू-काश्मीर | ५८.० |
| ८ | झारखंड | ५६.२ |
| ९ | बिहार | ५३.३ |
| १० | राजस्थान | ५२.७ |

**महाराष्ट्र शैक्षणिक स्थिती**

- प्राथमिक शाळांची संख्या : सुमारे ७५०००
- माध्यमिक शाळांची संख्या : सुमारे २१०००
- उच्च माध्यमिक शाळा/महाविद्यालयांची संख्या : सुमारे ७०००
- माध्यमिक शालान्त परीक्षा(दहावी) विद्यार्थी संख्या : सुमारे १७ लाख
- उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा(बारावी) विद्यार्थी संख्या : सुमारे १४ लाख

**उच्च शिक्षण**

महाराष्ट्रातील विद्यापीठांची संख्या : ४४
महाविद्यालयांची संख्या (सर्व शाखा) : ४६३१
महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या सुमारे २० लाख

आमच्या लहानपणी आम्ही शाळेत चुकीचं वागलो, चुकीची उत्तरं दिली तर शिक्षक आम्हाला शिक्षा करायचे. अंगठे धरायला लावायचे, उठाबशा काढायला लावायचे, हातावर छडी मारायचे; त्यामुळे आपण चुकीचं वागू नये, नीट-व्यवस्थित अभ्यास करावा असे धडे आम्हाला मिळाले. शिक्षकांच्या शिक्षेचा धाक होता. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारू नये, कठोर शिक्षा देऊ नये असा अलिकडच्या काळातील मतप्रवाह आहे, त्यात तथ्यंदेखील आहे. 'छडी लागे छमछम विद्या येई घमघम' असं त्याकाळी म्हटलं जायचं. आज परिस्थिती बदलली आहे. शिक्षणाचं महत्त्व समाजाला पटलेलं आहे. शिक्षणाच्या बाबतीत अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत त्यामुळे शिक्षणाचं स्वरूपही बदलायला हवं, हे खरंच आहे. पण आज विद्यार्थ्यांच्या चुकीच्या वागण्याबद्दल एखाद्या शिक्षकाने शिक्षा करायचं ठरवलं, तर पालकांचा प्रक्षोभ आणि नंतरच्या कारवाईचा धाक एवढा आहे की, अगदी साधी शिक्षा सुद्धा विद्यार्थ्याला करण्यास शिक्षक धजावणार नाही. शिक्षक-विद्यार्थी आणि पालक यांच्या नात्यामध्ये विश्वासाचं वातावरण जर नसेल, तर विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार कसे घडतील? विद्यार्थ्याला चुकीच्या मार्गापासून कोणाला रोखता येईल? विद्यार्थ्याला शिक्षा द्यावी की नको हा विचार करताना, हे मुद्देही लक्षात घेतले पाहिजेत.

खूप पूर्वीच्या काळी मुलांना शिक्षणासाठी गुरुगृही पाठवलं जात असे. राजा असो की रंक, साऱ्यांचीच मुलं गुरुकुलात रहात असत. गुरुकुलाच्या परंपरेनुसार एकाच प्रकारची वस्त्रं नेसत असत. गुरुकुलातील कामं करत असत. गायीचं दूध

काढणं, आश्रमाची झाडलोट करणं, स्वच्छता राखणं, रानात जाऊन लाकडं गोळा करून आणणं, नदीवरून पाणी आणणं, स्वयंपाक रांधण वगैरे. त्यांच्यात कोणताही भेदभाव केला जात नसे. गुरुकुलातील कामे आटोपल्यानंतर आश्रमातील झाडांच्या सावलीत गुरू मुलांना वेगवेगळ्या विद्यांचं, कलांचं शिक्षण देत असत. मुलांना उत्तम घडवत असत. त्या काळात शिक्षणामध्ये नीतिमत्तेवर भर असायचा. परंतु, आज पुस्तकं उघडल्यानंतर त्यामध्ये नीतिमत्तेबद्दलचा विचार शोधूनही सापडत नाही. पुरातन काळी गुरू-शिष्यांना हृदयापासून हृदयापर्यंत शिकवत असत. आज ही परंपरा खंडित झालेली दिसते.



गुरुकुलात विद्यार्थी स्वावलंबी बनत असत. विविध विद्यांमध्ये निपुण बनत असत. सर्व भेदभाव विसरून शिष्य एकत्र रहात असत. गुरुकूल म्हणजे एक प्रकारचं रेसिडेन्शियल स्कूल असे. तेव्हाच्या समाजाचं चित्र गुरुकुलात दिसत असे. लोक कशाप्रकारे जगतात? गरिबी काय असते? गरीबांचे प्रश्न काय आहेत? याची जाण तिथेच शिकणाऱ्या राजाच्या मुलाला म्हणजे राजपुत्राला, प्रधानपुत्राला, सेनापती-पुत्राला येत असे आणि त्याचं प्रतिबिंब ते जेव्हा राज्यकारभार हाती घेत असतं, तेव्हा त्यांच्या कारभारात उमटत असे. आज काय चित्र दिसत आहे?

आज आमदार-खासदार मंत्र्यांची मुलं विदेशात शिकतात, मोठ्या पदव्या मिळतात, पण ज्या जमिनीशी त्यांचा संबध आहे, तिथल्या परिस्थितीशी त्यांना घेणं-देणं नसतं. लोक कसे जगत आहेत, याची त्यांना जाण नसते. श्रीमंतीचं सुख घेत असताना गरिबांचं जीणं समजून घेण्यात त्यांना रस दिसत नाही. आपल्या आई-वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून ही मुलं नेतागिरी करतातही, पण त्यांची नाळ इथल्या जमिनीशी जुळत नाही. त्यांनी घेतलेले निर्णय जनतेला पसंत पडत नाहीत. जनता असमाधानी असते. जनतेचा पाठिंबा त्यांना मिळत नाही, त्यामुळे तेही असमाधानी बनतात. जनतेची आणि त्यांची वेव्हलेंथ जुळत नाही आणि त्यामुळे त्यांची व जनतेची-दोघांचीही फरफट होते.

आज शिक्षणात समानता राहिलेली दिसत नाही. श्रीमंताच्या शाळा वेगळ्या, गरीबांच्या शाळा वेगळ्या असं चित्र दिसतं. ज्यांच्याकडे पैसा आहे, कुवत आहे त्यांची मुलं उत्तम सुविधा असलेल्या शाळांमध्ये जातात, इंग्रजी माध्यमांच्या शाळांचं फॅड अलीकडे खूप वाढलं आहे. उत्तम सुविधा असलेल्या, इंग्रजी माध्यमाच्या शाळांचं शुल्क खूप असतं. शिवाय तिथे सहज प्रवेश मिळत नाही. गरीब मुलं सरकारी शाळांमध्ये जातात, धर्मादाय संस्थांनी चालवलेल्या शाळांमध्ये जातात. तिथे सुविधांची वानवा असते. शिक्षणाच्या बाबतीतल्या या दुजाभावामुळे विद्यार्थ्यांमध्येही श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव निर्माण होतो. गरीब म्हणजे हीन दर्जाचे अशी भावना तयार होते. उच्च वर्गीयांत अहंगड आणि निम्नवर्गीयांमध्ये न्यूनगंड तयार होतो आणि याचा परिणाम समाजाच्या एकूणच विकासावर होतो. समाज बलशाली बनत नाही. हे चित्र बदलण्याची नितांत गरज आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे स्वावलंबनाची. आजच्या शिक्षणपद्धतीत मुलं शाळेत जातात, शिकतात, ग्रॅज्युएट होतात. मोठी पदवी मिळवलेला विद्यार्थी मोठ्या फुशारकीने सांगतो, 'मला चहा करता येत नाही.' या गोष्टीचा अभिमान वाटला पाहिजे की खंत? जगण्यासाठी आवश्यक छोट्या छोट्या गोष्टींसाठी तुम्हाला कुणावर अवलंबून रहावं लागत असेल, तर तुम्ही मोठ्या पदव्या मिळवूनही, काय मिळवलं? श्रमाच्या कामांबद्दल तिरस्काराची भावना दिसून येते, श्रमाची कामं हलकी मानली जाऊ लागली आहेत, हे अतिशय दुर्दैवी आहे; शेतात कष्ट करणारा शेतकरी हा खरंतर अन्नदाता! पण त्याला आज प्रतिष्ठा नाही, कारखान्यात राबणाऱ्या कामगाराला प्रतिष्ठा नाही, वास्तविक, प्रत्यक्ष उत्पादनात त्याचा सहभाग असतो. खरंतर श्रमाला प्रतिष्ठा हवी. काम कोणत्याही स्वरूपाचं असो, ते काम आहे आणि त्या कामाचा आदर केला पाहिजे. समाजाच्या स्वास्थ्यासाठी ते आवश्यक आहे. शिक्षणाने हा भेदभाव नष्ट केला पाहिजे; असं शिक्षणच समाजाला पुढे नेऊ शकतं.

व्यवस्थापनशास्त्राच्या तत्त्वांमध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट ही सांगितली आहे की, 'मॅन इज मोअर इम्पॉर्टंट दॅन मशिन' माणूस हा यंत्रापेक्षा मोठा आहे, महत्त्वाचा आहे. माणसाला शिक्षण देणं, सुशिक्षित करणं म्हणजे त्याला जबाबदार बनवणं. त्याच्यावर सोपवलेल्या कामाची जबाबदारी त्याला समजली पाहिजे. एखादा ड्रायव्हिंग शिकला असेल आणि ड्रायव्हर म्हणून त्याला जबाबदारीचं भान असेल, तर एखादी सतत बंद पडणारी जुनी मोटारसुद्धा तो व्यवस्थितरीत्या दुरुस्त करून चांगल्याप्रकारे

चालवू शकेल आणि याचा फायदा सर्व संबंधितांना होईल, हे जितकं सत्य आहे तितकंच, एखाद्या ड्रायव्हरला त्याच्यावरच्या जबाबदारीचं भान नसेल, तर मर्सिडीझ बेन्झसारखी लाखो-कोट्यवधी, रुपयांची गाडी दोन कि.मी. पर्यंत चालवतानाही तो चार-पाच अपघात करू शकतो. म्हणजेच शिक्षणाबरोबर येणाऱ्या जबाबदारीचं भान देणारं शिक्षण असलं पाहिजे. माणसाला यंत्र बनवणं, हे शिक्षणाचं उद्दिष्ट नसून




विद्यार्थ्याला माणूस बनवणं हे शिक्षणाचं उद्दिष्ट असलं पाहिजे. अमुक कामासाठी अमुक व्यक्ती योग्य आहे अथवा नाही हे तपासून, निश्चित करून त्याला त्या कामाचं शिक्षण देण्यासंबधी निर्णय घेतला पाहिजे.

मी पुराणकाळातली वांगी का भाजतो, असं तुम्ही विचाराल. पुराणातल्या गोष्टी खऱ्या घडल्या किंवा नाही, हे सांगता येणार नाही. पण त्यात एक तत्त्वज्ञान आहे, त्याच्या आधारे या गोष्टी आपल्याला पटू शकतात. उदाहरणार्थ, समुद्रमंथनाच्या वेळी चौदा प्रकारची वेगवेगळी रत्नं बाहेर पडली. ब्रम्हदेवाने देवांना व दानवांना सांगितलं की, त्या रत्नांना ज्या ठिकाणी जायचं, तिथे जाऊ द्या. तुम्ही जर ते रत्न ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, त्याच्यावर मालकी हक्क दाखवण्याचा प्रयत्न केलात आणि त्याला जिथे जायचे आहे तिथे जाण्यापासून रोखलंत, तर त्याच्यापासून होणारा फायदा तुम्हाला प्राप्त होणार नाही, उलट दुष्परिणाम भोगावा लागेल. म्हणजेच ज्याची जी इच्छा आहे, त्याप्रमाणे त्याला घडू दिलं पाहिजे, याचा फायदा जितका त्याला मिळतो तितकाच तो त्याच्याशी संबधित इतरांना मिळू शकतो.

अलीकडे 'थ्री-इडियट्स' हा चित्रपट गाजला आहे. हा चित्रपट हेच तत्त्व सांगतो. एखाद्या व्यक्तीला वाटतं, माझ्या मुलाने डॉक्टर व्हावं, इंजिनिअर व्हावं, पण त्याचा इंटरेस्ट वेगळा असेल, तर त्याला त्याप्रमाणे घडू दिलं पाहिजे. एखादा डॉक्टर बनतोही, पण तो अभिनयाकडे वळतो. नटसम्राट बनतो. एखादा इंजिनियर होतो, पण फोटोग्राफीचा व्यवसाय करतो. समाजात अशी अनेक उदाहरणं आपल्याला दिसतात. एखाद्यावर एखाद्या विषयाचं शिक्षण लादणं म्हणजे त्या शिक्षणावर आपण किंवा समाजाने केलेला खर्च वाया गेला, असंच म्हणावं लागेल. प्रत्येकाला त्याच्या आवडीनुसार शिक्षण मिळालं पाहिजे, हे खरं पण आज इच्छा, आवड असो वा नसो, ज्या क्षेत्राची चलती आहे, ज्या क्षेत्रात पैसा आहे त्या क्षेत्राचं शिक्षण घेण्यासाठी चढाओढ लागलेली दिसते. परिणामी संगणकशास्त्र, व्यवस्थापन शास्त्राचं शिक्षण देणारी भरमसाठ कॉलेजेस निघाली, ट्युशन क्लासेस निघाले, ढिगाने संगणकतज्ज्ञ, व्यवस्थापन तज्ज्ञही तयार झाले पण आज एम.बी.ए.च्या डिग्र्या हातात घेऊन दारोदार फिरण्याची वेळ अनेकांवर आलेली दिसते. केवळ उपयुक्त शिक्षण घेण्याकडे असलेला कल अंतिमत: धोक्याचा ठरू शकतो.

शिक्षणाच्या संदर्भात आरक्षणाचा विषय आजकाल मोठ्या चर्चेत आहे. आरक्षणाच्या मुद्यावरून गदारोळ माजणं हे नेहमीचं झालं आहे. समाजाच्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने सर्व समाज समान पायावर उभा राहणं हे आवश्यक आहे. समाजातल्या सर्व घटकांना समान संधी व समान न्याय मिळाला पाहिजे, याबद्दल कोणाचेच दुमत असण्याचे कारण नाही. माझ्या मते, समाजातल्या वंचित, उपेक्षित राहिलेल्या घटकांना स्पर्धेकरिता सक्षम बनवण्यासाठी मुलांना शालेय स्तरापासून सपोर्ट दिला पाहिजे, त्यांच्या सर्व गरजांची पूर्तता केली पाहिजे, त्यांच्यात कुवत निर्माण केली पाहिजे, त्यांची सक्षमता ९५ टक्क्यांपर्यंत वाढवली पाहिजे त्यानंतर आरक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या योग्यतेनुसार त्यांना उच्चशिक्षणासाठी प्रवेश दिला पाहिजे. असं झालं तर समाजाला या नीतीचा खऱ्या अर्थाने फायदा मिळेल. तसं पाहिलं तर, हे सहज शक्य आहे. पण प्रत्यक्षात समाजातील वेगवेगळ्या घटकांनुसार देण्यात आलेलं आरक्षण हीच पात्रता ठरते. त्यानुसार वेगवेगळ्या अभ्यासक्रमांना प्रवेश दिले जातात क्षमतावाढीतून पात्रता निर्माण करणं हे घडत नाही. परिणामी आपण या देशात पुन्हा एक प्रकारची विषमताच पसरवतो.

दुसरा मुद्दा डोनेशनचा. शिक्षण क्षेत्रात डोनेशनचं प्रस्थ इतकं फोफावलं आहे की, शिक्षणाचा बाजार झाला आहे. एखाद्या विद्यार्थ्याची भले तो श्रीमंत असेल वा गरीब, शैक्षणिक पात्रता नसताना त्याला अपेक्षित गुण मिळालेले नसताना, शैक्षणिक संस्था मागेल तेवढे डोनेशन देऊन त्याला विशिष्ट अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येतो. त्यामुळे प्रत्यक्ष गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यावर अन्याय होतो. कोणी श्रीमंत असेल तर तो डोनेशनसाठी खिशातले पैसे देतो. कोणी गरीब असेल तर तो कर्ज काढून डोनेशनसाठी पैसा उभा करतो. 'पैसा' हे शिक्षण विकत घेण्याचं साधन ठरणं हे योग्य की अयोग्य, याचा विचार करण्याची वेळ आली आहे; कारण एखादा सर्वसाधारण विद्यार्थी वारेमाप डोनेशन देऊन शिक्षण घेतो, पदवी मिळवतो, तेव्हा त्याचा कल त्या शिक्षणाच्या उपयोगातून पैसे वसूल करण्याकडे झुकतो. माझ्या वडिलांनी माझ्या मेडिकलच्या शिक्षणासाठी पंचवीस लाख रुपये खर्च केले, ते मी वसूल का करू नयेत, हा त्याचा सवाल असतो. पैसा वसूल करण्यासाठी दोन पैसे जादा कमावण्याच्या नादात, ही व्यक्ती रुग्णाला कदाचित वेगवेगळ्या प्रकारच्या अनावश्यक टेस्ट करून घेण्यास भाग पाडते, आवश्यकता नसताना स्वतःच्या रुग्णालयात दाखल करून घेते. त्याचा औषधोपचारांचा खर्च वाढवते. अंतिमतः तो रुग्ण बरा होतो, व तो त्या डॉक्टरला दुवाही देतो. डॉक्टरने जादा पैसे कमावण्याचा उद्योग केल्याचं त्याच्या गावीही नसतं. आज कायदेशीर कामासाठी एखादा वकील शंभर रुपये घेतो, तर दुसरा वकील त्याच कामासाठी एक लाख रुपये मागतो. दोघांच्या कामात असा काय फरक असतो? शिक्षणामुळे मिळालेल्या ज्ञानाची किंमत ठरवण्याला एक मर्यादा असते. ती आता राहिलेली दिसत नाही. शिक्षणामुळे मिळालेल्या पात्रतेच्या आधारे लुटमार करण्याची प्रवृत्ती वाढताना दिसत आहे. याला आपण 'व्हाईट कॉलर क्राईम' म्हणतो. शिक्षणाचा असा दुरुपयोग अयोग्य आहे. शिक्षणाच्या तत्त्वाच्या ते विरोधात आहे. गीतेमध्ये असं म्हटलं आहे की, ज्ञानी माणसांनी अडाणी माणसांची दिशाभूल करून त्यांना भलत्यासलत्या मार्गाला नेऊ नये. म्हणजेच, डॉक्टर असेल तर त्याने एखादा आजार खरोखरच गंभीर असेल तर त्याचं गांभीर्य रुग्णाला किंवा त्याच्या आप्तांना सांगितलंच पाहिजे, पण एखादा किरकोळ आजार हा गंभीर असल्याचं अतिशय गंभीर अविर्भावात सांगणे, ही रुग्णाची दिशाभूल असते. रुग्ण व आप्तांचा डॉक्टरवर विश्वास असतो, या विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी डॉक्टरचीच असते; पण तो जेव्हा रुग्णाची दिशाभूल करतो, तेव्हा त्याचा विश्वासघात

करतो. नावेत बसलेल्या लोकांना सुरक्षित किनाऱ्यावर नेण्याची जबाबदारी नावाड्यावर असते; पण नावाड्यानेच नाव बुडवण्याचा प्रयत्न केला, तर त्यांना वाचवणार कोण? समाजाला आपल्या ज्ञानाचा फायदा झाला पाहिजे; जर तसा तो होत नसेल, तर ती ज्ञानाची एकप्रकारे विटंबनाच ठरते.

ज्ञान हे वाहतं असतं. त्यात नवीन नवीन प्रवाह येत असतात. आपण मिळवलेल्या ज्ञानातही सतत भर पडली पाहिजे. ते अद्ययावत राहिलं पाहिजे. यासाठी प्रशिक्षणाची गरज असते. मात्र एकदा ज्ञान प्राप्त केल्यावर, पदवी मिळवल्यावर नोकरी लागल्यावर त्या ज्ञानाचं प्रशिक्षण घेणाऱ्यांची, ते अद्ययावत ठेवणाऱ्यांची टक्केवारी फार कमी आढळते. प्रशिक्षणाच्या बाबतीत मोठी उदासीनता दिसून येते. प्रशिक्षणामुळे माणूस अद्ययावत होतो, त्याला त्याच्या क्षेत्रात चालू असलेल्या नवनव्या संशोधनाची, नवनव्या बदलांची माहिती मिळते. त्यामुळे त्याच्या सेवेचा दर्जा सुधारतो. यासाठी वेगवेगळ्या स्तरावरील कर्मचाऱ्यांसाठी ट्रेनिंग प्रोग्रॅम घेतले जातात; पण त्यासाठी कर्मचाऱ्यांमध्ये उत्सुकता आढळत नाही. हे एक फॅड समजून त्याकडे दुर्लक्ष केलं जातं. ही एकप्रकारची शोकांतिका आहे. प्रशिक्षणाचं महत्त्व समाजात अधोरेखित होण्याची गरज आहे. अन्यथा जुन्याच पोतड्या पुन्हा पुन्हा शिवल्या जातील व समाजाची खऱ्या अर्थाने प्रगती होणार नाही.

समाजाचा शैक्षणिक स्तर जसजसा उंचावत जातो. तसतसा गुणवंताचा गुणगौरव होणं आवश्यक ठरतं. गुणगौरवामुळे गुणवंताचा नावलौकिक होतो व त्याला अधिक चांगलं काम करण्याची प्रेरणा मिळते पण याचबरोबर जे अपयशी होतात त्यांनाही प्रोत्साहन मिळायला हवं त्यांच्या प्रयत्नांची दखल समाजाने घेतली पाहिजे. अनेक मोठ्या व्यक्ती त्यांच्या जीवनाच्या एका टप्प्यावर अपयशी झाल्या होत्या, पण आपल्या प्रयत्नांनी अपयशावर मात करून ते यशस्वी झाले. अशा मोठ्या व्यक्तींची उदाहरणं त्यांच्या समोर ठेवून त्यांचं मनोबल उंचावणं, हे समाजाचं कर्तव्य आहे.

आज शिक्षणाची अवस्था काय आहे, याचा विचार केला तर आपण पाहतो की, विद्यार्थ्यांचं जीवन आपण धावपळीचं करून टाकलं आहे. सकाळी विद्यार्थ्यांची शाळेची रिक्षा, व्हॅन किंवा बस येते, विद्यार्थी दप्तराचं ओझं सावरत कसाबसा वाहनात बसतो, रस्त्यातल्या ट्रॅफिक जॅममधून प्रदूषणातून कसाबसा शाळेत पोहचतो, पाच-सहा तासांच्या शाळेत एका पाठोपाठ एक विषय शिकवले जातात आणि संध्याकाळी

पुन्हा धावपळ करत विद्यार्थी घरी पोहचतो. शाळेत जाण्या-येण्यात त्याचा जेवढा वेळ वाया जातो, त्या वेळात त्याला आणखी दहा विषय शिकता आले असते, असं मला वाटतं. याशिवाय क्लास, टयुशन्स, शाळेच्या परीक्षा, बोर्डाच्या परीक्षा, ॲडमिशनसाठी सी.ई.टी. अशा अनेक गोष्टींमध्ये आपण विद्यार्थ्यांना भरडून टाकलं आहे. नवीन पिढीला आपण शिक्षणाच्या बाबतीत अतिशय त्रासदायक मार्गाने नेत आहोत. त्यामुळे शिक्षण म्हणजे ज्ञान मिळवण्याचं साधन नव्हे, तर नोकरीसारख्या उपयुक्त गोष्टीचं साधन असा समज बळावला आहे. ज्ञानापेक्षा किती गुण मिळवले याला अधिक महत्त्व आलं आहे. त्यामुळे नोट्स, गाईड्स अति महत्त्वाचे प्रश्न व त्यांची उत्तरं, अपेक्षित प्रश्नसंच अशा शॉर्टकट्सनाच अधिक भाव आलेला आहे. शिक्षणाची अशी गत होणं, हे दुर्दैवी आहे.

शिक्षकांच्या बाबतीत म्हणायचं तर, मुलांना शिकवण्याची ज्यांना तळमळ आहे. मनापासून इच्छा आहे, असेच शिक्षक तयार झाले पाहिजेत. शिक्षकी पेशा म्हणजे एक बऱ्यापैकी पगार देणारी सुरक्षित नोकरी आहे, ज्यात कष्टाचं काम नाही, फारशी जोखीम नाही अशा विचाराने जे या पेशात येतात, शिक्षक-प्राध्यापक होतात. ते प्रत्यक्षात काय शिकवतात, किती विद्यार्थी घडवतात यावर लक्ष ठेवण्याची काहीतरी व्यवस्था असली पाहिजे. पूर्वीच्या काळी समाज शिष्य-गुरू या परंपरेने ओळखला जायचा. शिष्यामुळे गुरुचा गौरव व्हायचा, हे आज कुठल्याही क्षेत्रांत दिसत नाही. आज एखादा विद्यार्थी नावलौकिकाला प्राप्त झाला तर तो कुठल्या शाळेत शिकला, त्याचे गुरू कोण होते, याचा फारसा उल्लेख होत नाही. याचा एक अर्थ समाजात गुरूंचा म्हणजे शिक्षकांचा फारसा दबदबा राहिलेला नाही किंवा दुसरा अर्थ, शिक्षक त्या योग्यतेचे राहिले नाहीत असा होऊ शकतो.

शिक्षणातून ज्याप्रमाणे माणूस ज्ञानी झाला पाहिजे, त्याचप्रमाणे समाजातल्या वेगवेगळ्या घटकांना त्यांच्या हक्क व कर्तव्यांची जाण मिळाली पाहिजे. आज समाजात वेगवेगळ्या प्रकारचे लोक वेगवेगळ्या प्रकारचं काम करतात. मात्र, त्यांना त्यांच्या हक्क व कर्तव्यांबाबत प्रशिक्षण देण्याची कोणतीही व्यवस्था नाही. उदाहरणार्थ, आपल्या घरात काम करणाऱ्या घरकामगार महिलेलासुद्धा प्रशिक्षणाची गरज आहे. घरकामगार म्हणून काम करताना तिचे हक्क काय आहेत, तिला तिच्या कामाचा मेहनताना किती मिळाला पाहिजे, त्याचबरोबर तिची कर्तव्य काय आहेत, तिच्या जबाबदाऱ्या काय आहेत, कायद्यानुसार कोणत्या गोष्टींची पूर्तता तिने केली पाहिजे

वगैरे बाबतीत तिला प्रशिक्षण मिळालं पाहिजे. दोन्ही बाजूंनी कोणत्याही प्रकारचं एक्सप्लॉयटेशन, कोणत्याही प्रकारची पिळवणूक होऊ नये यासाठी हे आवश्यक आहे. एखादी व्यक्ती ड्रायव्हर असेल, तर तिला वाहतुकीचे नियम माहीत असले पाहिजेत, वेगवेगळ्या प्रकारच्या मालाची वाहतूक करताना त्यासंबधी सुरक्षिततेच्या दृष्टीने काय काळजी घेतली पाहिजे याचं प्रशिक्षण त्याला दिलं गेलं पाहिजे. उदाहरणार्थ, पेट्रोल, गॅस सारख्या स्फोटक मालाची वाहतूक असेल, तर त्याबाबतीत काय काळजी घेतली पाहिजे किंवा आपल्या वाहनाची क्षमता काय काय आहे, क्षमतेपेक्षा जास्त मालाची वाहतूक होत आहे का? याबद्दल त्याला माहिती हवी. क्षमतेपेक्षा जास्त माल वाहनात भरला असेल, तर त्याला नकार देण्याची त्याची तयारी प्रशिक्षणातूनच त्याला प्राप्त होऊ शकते.

शिक्षणाच्या संदर्भात आणखी एक कळीचा मुद्दा आहे- संशोधनाचा! शिक्षणाला संशोधनाची जोड मिळाली पाहिजे. विकासासाठी संशोधन आवश्यक असते. अर्थातच संशोधन हे समाजाकरिता, लोकांकरिता उपयुक्त असलं पहिजे. उदाहरणार्थ, मी जर कुत्र्याचं शेपूट वाकडं का असतं आणि ते सरळ का करता येणार नाही, याच्यावर संशोधन करून पीएच.डी. मिळवली तर त्या संशोधनाचा समाजाला काय उपयोग आहे? या संशोधनावर मी खर्च केलेला पैसा वायाच जाणार नाही का? हा पैसा समाजाचा असतो, त्याचा लाभ समाजाला मिळाला पाहिजे. म्हणजेच संशोधन लोकाभिमुख पाहिजे. त्यासाठी संशोधन प्रकल्पांच्या निवडीवर, त्याच्या प्रगतीवर जाणकारांनी लक्ष ठेवले पहिजे व निरर्थक संशोधनाला वेळीच आवर घातला पाहिजे. दुर्दैवाने असं घडताना दिसत नाही. पीएच.डी. करणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या सादरीकरणाच्या वेळी उपस्थित राहण्याची एक संधी मला मिळाली होती. विद्यार्थ्याला त्याच्या थिसीसचं सबमिशन करण्यापूर्वी असं सादरीकरण करणं आवश्यक असतं. त्या विद्यार्थ्याच्या सादरीकरणाला केवळ दोन-चार लोकच उपस्थित होते व त्यांच्यापैकी एकानेच त्याला काही प्रश्न विचारले. या सादरीकरणानंतर त्या विद्यार्थ्याला पीएच.डी. मिळाली असेलही, पण जाणकारांची उदासीनता त्यावेळी मला दिसली.

दुसरी गोष्ट म्हणजे, उपयुक्त संशोधन लोकांपर्यंत पोहचलं, तरच त्याचा खऱ्या अर्थाने उपयोग होऊ शकतो. अन्यथा, संशोधन व त्यानंतरचा खर्च वाया जाऊ शकतो. उदाहरणार्थ, कडब्यावर युरिया प्रक्रिया करून कडब्याची पाचकता व पौष्टिकता वाढवता येते, अशाप्रकारचं संशोधन झालं त्याबद्दल पीएच.डी. बहाल झाली. मात्र

प्रत्यक्षात त्या प्रकारची प्रक्रिया करताना शेतकरी दिसत नाहीत. ही या संशोधनाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. संशोधन लोकांपर्यंत प्रभावीपणे न पोहचल्यामुळे लोक त्याचा अवलंब करत नाहीत. त्यामुळे त्या संशोधनावर केलेला खर्च मातीमोल ठरतो. बऱ्याचदा असंही दिसतं की, संशोधन एकाप्रकारे चालतं आणि लोकांची गरज ही वेगळ्या प्रकारची असते त्यामुळे संशोधनाचा व लोकांच्या गरजेचा मेळ बसत नाही व ते संशोधन निरुपयोगी ठरतं.

संशोधन लोकाभिमुख असलं पाहिजे, हे आधी म्हटलंच आहे. त्याचबरोबर संशोधन मूलभूत असायला हवं. उदाहरणार्थ, दोन माणसांच्या कुटुंबाला एक महिन्यासाठी किती गॅस आवश्यक आहे, याबाबत संशोधन झालं आहे का? ते जर झालं, तर समाजासमोर एक निश्चित परिमाण उपलब्ध होऊ शकतं. गॅसचा एक सिलेंडर दोन माणसांच्या कुटुंबाकरता तीन महिने पुरेल असं जर संशोधनातून स्पष्ट झालं, तर गॅसच्या वितरणासंदर्भात निर्णय घेणं सुलभ होऊ शकतं, समाजाला त्याचा फायदा होऊ शकतो. संशोधनाबाबत असा विचार होण्याची गरज आहे. ठराविक कालावधीनुसार शैक्षणिक अभ्यासक्रमाचा पुनर्विचार केला जातो. त्यावेळी अभ्यासक्रम कसा असला पाहिजे, याबाबत संशोधन होतं का? लोकांची मतं मागवली जातात का? आणि मागवली तरी त्यांच्या मतांचा विचार होतो का? थोडक्यात, संशोधनात लोकांच्या मतांचा, गरजांचा विचार झाला तर खऱ्या अर्थाने संशोधन लोकाभिमुख होऊ शकतं. संशोधनाच्या बाबतीत असा विचार होणं गरजेचं आहे.

शेवटी शिक्षणाच्या संदर्भात महत्त्वाचा मुद्दा आहे नैतिकतेच्या शिक्षणाचा. आज कोणतंही शालेय किंवा महाविद्यालयीन पुस्तकं उघडल्यानंतर त्यात नैतिकतेबद्दल काही दिसत नाही, असं आधी म्हटलंच आहे. नैतिकतेचे सतत वाजणारे ठोके समाजाला चांगल्या मार्गावर नेऊ शकतात. नरेंद्र महाराज म्हणतात त्याप्रमाणे ‘जगा आणि जगू द्या’ किंवा वामनराव पै म्हणतात त्याप्रमाणे ‘सगळं जग सुखी व्हावं’ असा जगाच्या भल्याचा विचार शिक्षणातून रुजायला हवा; आपण जर व्यवस्थित वागलो, जगण्याची शिस्त सांभाळली तर इतरांना त्रास होणार नाही अशी सर्वांची काळजी घेण्याची नैतिकता समाजात येईल, तेव्हा शिक्षणाचं महत्त्व समाजासमोर येईल, आणि दुर्दैवाने शैक्षणिक व्यवस्थेत नैतिकतेचा अभाव दिसतो. कोणीही कोणतीही नैतिकता पाळताना दिसत नाही. कोणी किती पैसे कमवावेत हे ठरत नाही. शैक्षणिक संस्थानी मोठमोठ्या जागा अल्पदरात घेऊन, वारेमाप डोनेशन घेऊन उभ्या केलेल्या इमारती

दिसतात. संस्थाचालक,शिक्षक-प्राध्यापक-विद्यार्थी यांची पिळवणूक करून स्वतःची घरं भरताना दिसतात. शिक्षणाचे जणू हे कारखानेच आहेत असं दुर्दैवाने म्हणावं लागेल.

शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर-प्राथमिक स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत- नैतिकतेच्या एका अभ्यासक्रमाचा समावेश हा असायलाच हवा, असं मला वाटतं. नैतिकतेप्रमाणेच देशप्रेमाच्या एका कोर्सचा तसंच संस्कारांच्या एका कोर्सचा समावेश झाला पाहिजे. त्यातून सामाजिक बांधिलकीची शिकवण दिली पाहिजे. त्यागाचा विचार, पुढच्या पिढीच्या भल्याचा विचार शिकवला गेला पाहिजे. द्रोणाचार्यांनी त्यांच्या सर्वांत आवडत्या शिष्याला अर्जुनाला ब्रह्मास्त्राचं ज्ञान दिलं. हे अस्त्रं जपून वापरलं पाहिजे ते संहारक आहे याची जाणीव अर्जुनाला होती, त्याने जबाबदारीचं पालन केलं, या अस्त्राचा उपयोग केला नाही. द्रोणाचार्यांनी पुत्रप्रेमापोटी हे ज्ञान अश्वत्थाम्यालाही दिलं होतं. त्याने या अस्त्राचा उपयोग करून संहार घडवला, त्याची झळ त्यालाही बसली. शिक्षणाचा उपयोग समाजाच्या हितासाठी, भल्यासाठी झाला पाहिजे; समाजाला लुटण्यासाठी, त्याच्या अहितासाठी होऊ नये ही नैतिकता समाजात निर्माण होणं गरजेचं आहे.